# आंबेडकर भवन वस्तुस्थिती

संपादन -
प्रा. गौतम गायकवाड



Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

# आंबेडकर भवन : वस्तुस्थिती

# Ambedkar Bhavan : Vastusthiti

संपादक -प्रा. गौतम गायकवाड

प्रकाशक
चिन्मय प्रकाशन,
सवणेकर बिल्डिंग,
जिजामाता कॉलनी, पैठण गेट,
औरंगाबाद. मो. ९८२२८७५२१९
chinmayprakashan@gmail.com

अक्षरजुळवणी
हर्षवर्धन मुंडे, अंबाजोगाई
वेदिका टाईपसेटर्स, औरंगाबाद.

© वर्षा गौतम गायकवाड
१५ ऑगस्ट २०१६.
डॉ. बाबासाहेबआंबेडकर यांच्या १२५ वी जयंती वर्ष, व लोककवी वामनदादा कर्डक यांचा स्मृतिदिन

मुद्रक
ओंकार प्रिंटर्स, औरंगाबाद.
मुखपृष्ठ संकल्पना :
प्रा. गौतम गायकवाड
मुखपृष्ठ : अपूर्वा ग्राफिक्स, औरंगाबाद.
₹ : १६०/-

ISBN NO - 978 - 93- 81948 -04 -0

Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani


२१. आंबेडकरी चळवळीसमोर उभे ठाकलेले नवे आव्हान.......................९६
२२. डॉ. बाबासाहेबांच्या निळ्या झेंड्याखाली एकत्र या !.......................९९
२३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकांची हत्या आणि
आंबेडकरवादी चळवळ.........— डॉ. सा. द. सोनसळे.........१०१
२४. आंबेडकर भवन चे उद्ध्वस्तीकरण व आंबेडकरवादीची भूमिका...१०५
२५. आंबेडकरी जनतेने संघटीत होण्याची हीच वेळ.......................१०९
२६. ट्रस्टींनी माफी मागावी.......................................................११२
२७. "आंबेडकर भवन उद्ध्वस्त करणाऱ्या प्रवृत्तीच्या निमित्ताने".........११६
२८. भैय्यासाहेब आंबेडकरांवरील टीका खपवून घेतली जाणार नाही....११९
२९. डॉ. आंबेडकर भवनच्या टाळूवरील लोणी कोणास प्रिय ?............१२१
३०. उंटावरच्या अतिशहाण्यांना अटक झालीच पाहिजे.......................१२५
३१. आंबेडकरी चळवळीतील अस्तीनीतील साप !.............................१२७
३२. तुमचे नातेवाईक चालतात, मग
डॉ. बाबासाहेबांचे नातू का नको ?...........................................१२९
३३. हा तर आंबेडकरांच्या विचारांचा पराभव !.................................१३१
३४. बावरी ते आंबेडकर भवन......................................................१३४
३५. सावधान ! डॉ. आंबेडकर भवन उध्वस्तीकरणाच्या निमित्ताने नवा
वामनावतार येत आहे..............................................................१३७
३६. 'आंबेडकर भवन उद्ध्वस्तेचा बोलविता धनी कोण ?'.....................१४०
३७. 'आंबेडकर भवन उद्ध्वस्ततेचे राजकारण'.....................................१४६

**संदर्भ व परिशिष्ठे** ......................................**१५० - १७६**

Warpudkar (ACS) College
Dist. Parbhani

# १२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकांची हत्या आणि आंबेडकरवादी चळवळ

- डॉ.सा.द.सोनसळे

दादर येथील आंबेडकर भवन, बुद्धभूषण प्रिंटींग प्रेसची अंधाऱ्या रात्री माथेफीरूंनी हत्या केली. आणि भारताच्या इतिहासातील काळ्या घटनांची आठवण झाली. भारतीय संस्कृतीवर हल्ला करणाऱ्या आक्रमकांची आठवण झाली. आक्रमक टोळ्यांनी अंधाराचा फायदा घेऊन ज्या पद्धतीने विध्वंस केला त्याच घटनेची प्रचिती आली आहे. अशा आतंकवादी कारवाया अंधाऱ्यारात्रीच होतात. परंतु त्या घटनेत आणि या घटनेत थोडा फरक जाणवतो. त्याकाळी देशावर आक्रमण करणारे परदेशी आक्रमक होते. आंबेडकरी चळवळीला बदनाम करणारे, बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेले स्मारक पाडणारेच याच देशातील आहेत. ज्या वास्तूत प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बुलंद आवाजाने अन्याय अत्याचाराच्या विरोधात डरकाळी फोडली होती, आपल्या झुंजार लेखणीने मनूचा मुडदा पाडला होता. ती वास्तू रात्रीच्या वेळी पाडणे षंढपणाचे लक्षण आहे. रक्तात भेसळ असणाऱ्यांचे लक्षण आहे. घुबडाचे पराक्रम रात्री चालू असतात. गर्भात आंबेडकरी बाण्याचे रक्त नसेल तर फालतू अवलाद जन्मत असते. ती फालतू अवलाद बापाच्या नरडीचा घोट घेण्यास तयार होते. अगदी असाच प्रकार बुद्धभूषण प्रेस आणि आबेडकर भवन पाडणाऱ्यांच्या बाबतीत झाला असावा. आंबेडकर भवन पाडणाऱ्यांच्या रक्ताची डी.एन.ए चाचणी झाली पाहिजे.

ज्या पद्धतीने बुद्धभूषण प्रेस आणि आंबेडकर भवन पाडले ते मनाला अतिशय वेदना देणारे आहे. त्या पापी कृत्यानंतर पुन्हा हलकटासारखे स्टेटमेंट देणे चीड आनणारे आहे. ज्या प्रज्ञासूर्याच्या अखंड परिश्रमाने आंबेडकरी समुहाला चांगले दिवस आले. तळागाळातील माणूस ताठ मानेने जगायला शिकला, त्याच समाजातील बायकांच्या पोटी विकृत अवलाद जन्मावी हा निसर्गाचा फार मोठा चमत्कार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वखर्चाने बुद्धभूषण प्रेस आणि आंबेडकर भवनाची जागा खरेदी केली होती. त्या जागेवर रक्तात भेसळ असलेले हरामखोर मालकी हक्क गाजवत आहेत. ज्या प्रवृत्तीने जागा हडप करण्यासाठी अतिशय गलीच्छ कृत्य केले त्या लोकांनी स्वत:ची कोणती जागा, प्रॉपर्टी समाजासाठी दिली आहे. आयत्या पीठावर रेघोट्या ओढण्याची रत्नाकार गायकवाड सारख्या उच्च विद्याविभूषीत व्यक्तीला जनाची नाही तर किमान मनाची तरी लाज वाटायला हवी होती. ज्या गावच्या बाभळी असतात, त्या गावच्या बोरी सुद्धा असतात. एक वास्तव माहित असेल की, नऊ महिने पिंडाला पोटात वाढवणाऱ्या माऊलीच्या प्रसुतीच्या वेळी जर हे लाडके बाळ आडवे आले तर त्याचे तुकडे तुकडे करून कापून काढले जातात. हा जगाचा नियम आहे. समाजाला माऊली महत्त्वाची असते आडवे आलेले बाळ नाळ कापण्याच्या आधीच कापले जाते हे जरा लक्षात ठेवावे. जनरल नॉलेज वाचून अधिकारी झालेल्या लोकांनी सामाजिक नियमांचाही अभ्यास करावा.

आंबेडकरी घराण्याला गुंड म्हणणाऱ्या हरामखोराची जीभ कल्ल्यापासून झडावी. असा विकृत गर्भ जन्मण्याआधी पडावा असे वाटते. कुळाला बट्टा लावणाऱ्या संततीला चांगले म्हणत नसतात. शेवटी तिरडीला हात लावायला खांदेकरी धजत नसतात. धन संपत्तीसाठी, पद अधिकारासाठी गद्दारी करणाऱ्यांना काळ माफ करत नसतो. भारताच्या इतिहासात आंभी राजाला कुणीही श्रेष्ठ मानत नाही. पुष्यमित्र शुंग आणि राजा मिहिरकुल समाजाचे आदर्श होत नसतात. विजेची चोरी करणारे, अनाधिकृत संस्थांना मान्यता देणारे आणि समाजिक क्षेत्रात गैर व्यवहार, भष्टाचार करणारे समाजाचे गुन्हेगार असतात. त्यांनी देशावर दरोडा टाकलेला असतो. हिटलरची अवस्था शेवटी फारच वाईट झाली होती. त्याने स्वत:वर गोळ्या झाडून घेतल्या होत्या, जगावर आक्रमण करणारा सिकंदर खाली हात वापस गेला होता आणि अफगाणिस्तानातील बुद्धमुर्ती फोडणारा ओसामा बिन लादेन सागराच्या तळाशी गाडला होता. हा इतिहास आंबेडकर भवन उद्ध्वस्त करणाऱ्यांनी पुन्हा एकदा वाचावा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेल्या प्रतिकांवर, वास्तूवर, विचारांवर सातत्याने आक्रमणं होत आहेत. कुणी त्यांनी काढलेल्या संस्था हडप करत आहेत, तर कुणी त्यांच राजगृहावर ताबा मिळवला आहे. त्यांच्या

पुतळ्यांची विटंबना करणारे सुद्धा याच विकृत मनोवृत्तीचे होते. बाबासाहेबांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटी काढली आणि त्या संस्थेवर खा. रामदास आठवले अध्यक्ष म्हणून मिरवत आहेत. ज्यांची हयात शरद पवारांचे झेंडे उचलण्यात गेली. त्या पवारांची सत्ता जाणार असे दिसले की, हा व्यक्ती ज्यांची सत्ता असले त्यांच्या घरांची डागडूजी करण्यासाठी गेला. अरे, दादा आपले घर गळत आहे. ते बेईमानांच्या गद्दरीने जळत आहे आणि तू कुठे दुसऱ्यांचे घर दुरूस्त करायला फिरतो आहेस. खा. रामदास आठवलेनी स्वत: कॉलेज काढून आनंदराज आंबेडकरांना त्यांचे अधिकार दिले आहेत काय ? तसे न करता आनंदराज आंबेडकरांच्या अजोबांच्या कॉलेजचे स्वत:च वारसदार असल्यासारखे मिरवत आहेत. बाबासाहेब आंबेडकरांना तीन नातू व एक नात असतांना इतर माणसे रक्ताने नातू असल्याचे घोषीत करतात. ही मोठी अजब गोष्ट आहे, ज्या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण संस्था काडली तो उद्देश बाजूला पडला आणि गुंडगिरीचा वापर करून शिक्षणसंस्था ताब्यात घेऊन झुंडशाही माजविली आहे. त्यांची मनोमन लाज वाटायला हवी. या बाबतीत समाज अशा लोकांना कधीच माफ करणार नाही.

मिलिंद महाविद्यालयाची जागा अनेकांनी पैसे घेवून काही लोकांना जबरदस्तीने बळकावयाला लावली. डॉ. बाबासाहबांनी स्वत:च्या कुटुंबासाठी काहीही धनसंपत्ती जमा केली नाही. आपला समाज पुत्रवत मानला. रमाईने हातातील बांगड्या विकून वसतीगृहातील उपासी मुलांना खाऊ घातले. बाबासाहेबांच्या पवित्र कार्याला जे गद्दार होतील ते त्यांच्या समाजाला विकून आपली पोळी भाजतील. त्यांच्या स्मरकांना उद्ध्वस्त करतील त्या लोकांचा वंश बुडतो. कारण जग बुद्धाच्या अंतिम सत्यावर आणि विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मार्गावर चालत आहे.

बुद्धभूषण प्रेस आणि आंबेडकर भवन उद्ध्वस्त करून जगातील तमाम बहिष्कृत, शोषित, वंचीत, कष्टकरी, आदिवासी, अल्पसंख्यांक समाजाचा अपमान केला आहे. ती आंबेडकरवादी जनतेच्या हृदयावरील खोल जखम झाली आहे. यामुळे आंबेडकरी चळवळीचे अतोनात नुकसान झाले आहे. शासनाने ह्या भावना लक्षात घेऊन खून, खराबा, रक्तपात टाळण्यासाठी वेळीच विकृत आणि मनोरुग्ण अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना अटक करावी.

सुशासन करावे. समाजात शातता निर्माण करावी. आंबेडकर भवनाची आणि बुद्धभूषण प्रेसची जी हत्या झाली आहे. त्यामुळे जगातील आंबेडकरी चळवळ दु:खी झाली आहे आणि म्हणून आंबेडकर भवन जसे होते तसे निर्माण करावे. ते निर्माण करत असताना ज्यांनी हे अर्ध्यारात्री पाडणचे काम केले. त्याच्या संपत्तीची चौकशी करून त्यांची मालमत्ता जप्त करावी. आणि त्या पैशातून नुकसान भरपाई करावी. बाबासाहेबांनी लिहिलेली पत्रे, कादपत्रे महत्त्वाचा दस्ताऐवज जो चोरून नेला आहे, असे प्रकाश आंबेडकर म्हणत आहेत. ती महत्त्वाची कागदपत्रे, पुन्हा आंबेडकर भवनात ठेवावीत. ज्या बुद्धभूषण प्रेस मध्ये आमच्या स्वातंत्र्याचा जाहिरनामा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिला ती वास्तू मुक्तिभूमी आहे. आंबेडकरी चळवळीवर हल्ला करणाऱ्यांना समाज वठणीवर आणू शकतो. या घटनेचे गंभीर परिणाम होवू शकतात. आंबेडर भवन उद्ध्वस्त करणाऱ्यांना, सुज्ञ आणि न्याय देणाऱ्यां मायबाप महाराष्ट्र शासनाने आंबेडकरी चळवळीच्या भावना लक्षात घेवून कृती करावी. आंबेडकर भवन आणि बुद्धभूषण प्रेसची उभारणी पूर्ववत करून ती आंबेडकरी घराण्याच्या ताब्यात द्यावी. कारण संपूर्ण आंबेडकरवादी समाज बाबासाहेबांच्या घराण्याच्या पाठीशी उभा आहे. आक्रमकांचे मनसूभे साकार होवू देणार नाही. ही भीम सैनिकांची प्रतिज्ञा आहे. तूर्त एवढेच !

(दै. सम्राट साभार)

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani